आदर्श मूल्ये असलेली व्यक्ती समाजाचा आधारस्तंभ बनते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार ९ जून २०२५ | अंक १७५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Touriism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007 | All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY

www.suntourismpune.in

सन टुरिझम

प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या

ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका

व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली

आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-

99222 22272 / 7602727555


# १० जूनपर्यंत राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाचे संकेत सुप्रिया सुळेंचीही सूचक प्रतिक्रिया



अजित पवार गट आणि शरद पवार गट अर्थात दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाच्या चर्चांना सध्या चांगलीच हवा मिळालेली आहे. दोन्ही पक्षातील नेते थेट आणि उघडपणे एकत्र येण्याबाबत विधानं करताना दिसत आहेत. दोन्ही पक्षांनी एकत्र आलं पाहिजे. थोरले आणि धाकले पवार एकत्र आले तर त्यात आक्षेप घेण्याचं काहीही कारण नाही, अशा प्रतिक्रिया दोन्ही पक्षातील नेत्यांकडून व्यक्त केल्या जात आहेत. असे असतानाच अजित पवार यांच्या पक्षाचे प्रवक्ते अमोल मिटकरीय यांनी आषाढी एकादशीपर्यंत वाट पाहा, असं मोठं विधान केलं आहे. त्यांच्या याच विधानावर आता खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.सर्व निर्णय लोकशाही पद्धतीनेच होतीलखासदार सुप्रिया सुळे यांनी अमोल मिटकरी यांनी केलेल्या विधानावर प्रतिक्रिया दिली आहे. कोणताही निर्णय घेण्याआधी पक्षातील शेवटच्या कार्यकर्त्याला विश्वासात घेतले जाईल. सर्व प्रकारचे निर्णय हे लोकशाही पद्धतीनेच होतील, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटलंय. पक्षातील शेवटच्या कार्यकर्त्याला विश्वासात घेऊनच...हा फक्त माझाच निर्णय नाही. याबाबत पक्षातर्फे निर्णय घेतला जाईल. गेल्या सहा दशकांपासून महाराष्ट्राने शरद पवार यांच्या कामाची पद्धत पाहिलेली आहे. शरद पवार जो निर्णय घेतात किंवा जे मार्गदर्शन करतात ते लोकशाही पद्धतीनेच होते. त्यामुळेच पक्षाचा जो काही निर्णय असेल तो पक्षातील शेवटच्या कार्यकर्त्याला विश्वासात घेऊनच घेतला जाईल. कोणताही निर्णय आम्ही आतापर्यंत एकाधिकारशाहीने घेतलेला नाही. यापुढेही कोणताही एकर्तफी निर्णय होणार नाही, असे सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केलं आहे.

## खरंच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का?

आम्ही वारकरी संप्रदायाचे आहे. आषाढी एकादशीचाच मुहूर्त कशाला हवा. कोणताही मुहूर्त असू शकतो असे सांगत मिटकरी यांनी सध्यातरी एकत्रिकरणाचा असा कोणताही प्रस्ताव नाही, असेही मिटकरी यांनी स्पष्ट केले. त्यामुळे आता येणाऱ्या काही काळात नेमकं काय घडणार? खरंच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

# नारायणगडावर ज्येष्ठ शुद्ध एकादशीला भाविकांची गर्दी

धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायण गडावर आज ज्येष्ठ शुद्ध एकादशीच्या निमित्ताने पंचक्रोशीतील लाखो भाविक भक्तांनी वारी करून श्री. नगद नारायण महाराजांचे दर्शन घेतले आहे. एकीकडे शेती कामाची धामधूम सुरू चालू असताना ही शेतातील कामे बाजूला सारून भाविक -भक्तांनी श्री विठ्ठल रुक्मिणी व श्री नगदनारायणाच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या यामुळे आज दिवसभर नारायणगडावर भाविक भक्तांची मांदियाळी पाहायला मिळत होती. महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री.क्षेत्र नारायण



गडावर शुद्ध एकादशीच्या निमित्ताने भव्य स्वरूपात वारी भरत असून या ठिकाणी गडावरती लाखो भाविक भक्त येऊन श्री नगद नारायण महाराज यांच्या समाधीसमोर नतमस्तक होऊन साकडे घालत असतात.या प्रमाणेच शनिवार दि. ७ जून रोजी ज्येष्ठ शुद्ध एकादशीच्या निमित्ताने गडावरती भाविक -भक्तांचा मोठा ओघ आला होता. प्रति मासिक वारी प्रमाणे याही वारीला पंचक्रोशीतील नव्हे तर जिल्हाभरातील भाविकांनी अगदी पहाटेपासूनच गडावर मोठी गर्दी केली होती. गडावर येणाऱ्या चारही रस्त्याने आज दिवसभर वाहनाची वर्दळ दिसून येत होती. श्री नगदनारायणाचे दर्शन घेऊन आज लाख खूप भाविक-भक्त आज आनंदाने गडावरती वावरताना दिसत होती. एकीकडे शेती कामाची धामधुम शेतकऱ्यांनी शेतातील कामे थांबून आज गडाची वारी करून आपली श्रद्धा व्यक्त केली होती. आषाढी एकादशीच्या निमित्ताने भाविकांना पंढरीकडे जाण्याचे आता वेध लागले आहेत. श्री.क्षेत्र नारायण गडावरून पंढरीकडे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी भव्य पायी दिंडी सोहळा निघणार आहे. त्याचे नियोजन व सोहळ्यामध्ये सहभागी भाविकांना करण्यासाठी आज रात्री गडावरती चक्री कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तनाच्या माध्यमातून गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी पंचक्रोशीतील भाविक -भक्तांना पायी दिंडी सोहळ्याचे नियोजन सांगून या सोहळ्याच्या पंढरीला जाण्यासाठी भाविक भक्तांनी सहभागी

# माजलगाव मध्ये भारतीय जनता पार्टीच्या वतीने पर्यावरण दिन साजरा

माजलगाव। प्रतिनिधी जागतिक पर्यावरण दिन २०२५ निमित्त भारतीय जनता पार्टी माजलगाव तालुक्याच्या वतीने कार्यक्रम आयोजित केला होता. हनुमान मंदिर,हनुमान चौक येथे महारुद्र हनुमानाचे दर्शन घेऊन त्या ठिकाणी कापडी पिशवी ठेवून कार्यक्रमाची सुरुवात केली व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे या अभियानाची सांगता केली. यामध्ये प्लास्टिकचा त्याग करून कापडी पिशव्या वापरण्याचा संकल्प केला व माजलगाव शहरांमध्ये विविध फळ गाड्यावाले , विविध भाजी मंडईसह विविध दुकानावर एक हजार कापडी पिशवी बॅग दिल्या, यावेळी माजलगाव शहरातील अनेक फळ गाड्यावाले व व्यापारी वर्गातील अनेक नागरिकांनी यानंतर आम्ही प्लास्टिकचा वापर करणार नाहीत असा संकल्प करत ग्वाही दिली. पर्यावरनाचा समतोल



राखणे खूप महत्त्वाचे आहे व कॅरीबॅग प्लास्टिक मुळे शरीराला होणारे आजार देखील खूप गंभीर आहेत, स्वच्छता हीच सेवा प्लॅस्टिक थर्माकोल मुक्त माजलगाव, प्लास्टिक पिशवी हटवूया ,पर्यावरणाचे रक्षण करूया अशा आशयाचे बॅनर फलक च्या माध्यमातून कापडी बॅग वाटप करताना सर्वांना सांगून कॅरीबॅग मुक्त होणे काळाची गरज आहे अशी माहिती देत प्रसार केला . येणाऱ्या काळात पर्यावरणाचा समतोल राहावा म्हणून आपण एक सुजाण नागरिक म्हणून तालुक्यातील सर्व नागरिकांनीच सहकार्य केले पाहिजे व संतांनी सांगितल्याप्रमाणे झाडे लावा झाडे जगवा,वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे,व्हावया पर्जन्यवृष्टी वृक्षांनी सजवासृष्टी,संकल्प नवे कृती करूया वसुंधरा वाचवण्यासाठी कटिबद्ध होऊया याप्रमाणे माजलगाव शहरात गजानन मंदिर येथील सिद्धिविनायक मंदिराच्या ठिकाणी वड ,कनेरी सह विविध झाडे लावली.येणाऱ्या काळात आपल्या मातृभूमीच्या व आपल्या वाढदिवसाच्या दिवशी ज्या ज्या ठिकाणी वृक्षारोपणसाठी जागा आहे अशा ठिकाणी झाडे लावण्याचा संकल्प भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते व उपस्थित अनेक नागरिकांनी याप्रसंगी केला.या अभियानाच्या कार्यक्रम प्रसंगी भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष अरुण राऊत,माजी नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके , प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ.प्रशांत पाटील,भाजपा शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी,किट्टी आडगाव मंडळ तालुका अध्यक्ष रूपाली कचरे, पात्रुड मंडळ तालुका

# दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांस कृषी पदविकेची संधी

बीड। प्रतिनिधी महाराष्ट्रात नियमित कृषि शिक्षण घेऊ न शकणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत मुक्त कृषि शिक्षण केंद्र, सौ. के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड. येथे नववी उत्तीर्ण विद्यार्थी देखील झेरॉक्स कागदपत्रावर माळी प्रशिक्षण हा एक वर्षाचा कोर्स पूर्ण करून पुढे कृषि पदविकेचे शिक्षण पूर्ण करू शकतो. कृषी शिक्षण पूर्ण केल्यानंतर अशा विद्यार्थ्यांना अनेक ठिकाणी शासकीय तसेच खाजगी नोकरीची व व्यवसायाची संधी उपलब्ध आहे. जसे की कृषी विभाग, कृषी विद्यापीठ, कृषी कंपनी तसेच स्वतः



चा कृषी व्यवसाय सुरू करण्यासाठी कृषी शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे. त्यासाठी सर्व परिसरातील विद्यार्थ्यांना आवाहन आहे की आपण आपला प्रवेश आजच निश्चित करा. या कृषि महाविद्यालयात विविध प्रकारचे कृषी अभ्यासक्रम चालविले जात असून यामध्ये कृषि पदविके अंतर्गत उद्यान विद्या पदविका, कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदविका, कृषि पत्रकारिता पदविका, फळबाग उत्पादन पदविका, भाजीपाला उत्पादन पदविका आणि फुलशेती उत्पादन पदविका अशा विविध शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय तसेच खाजगी नोकरीमध्ये तात्काळ संधी मिळतात. प्रवेश घेण्यासाठी ऑनलाइन नोंदणी दिनांक ०१/ ०६/२०२५ पासून चालू झालेले आहेत. तरी आपण ऑनलाइन नोंदणीसाठी प्रा. बी.बी. तांबोळकर किंवा प्रा. ए.पी. ढोरमारे यांच्याशी संपर्क साधावा.

# सेतू सुविधा केंद्रात दरफलक लावा-गणेश शेवाळे

पाटोदा । प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील सेतू सुविधा केंद्रांमधून विद्यार्थ्यां व शेतकऱ्यांकडून अनधिकृतपणे अधिक शुल्क आकारले जात असून, ही लूट त्वरित थांबवण्यासाठी प्रत्येक सेतू केंद्रात शासकीय दरफलक लावण्यात यावेत, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी तहसील प्रशासनाकडे प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. गणेश शेवाळे यांनी सांगितले की, शासनाने विविध प्रमाणपत्रे, दाखले व अन्य सेवांसाठी ठराविक दर निश्चित केले आहेत. परंतु प्रत्यक्षात अनेक सेतू केंद्र चालक या दरांपेक्षा अधिक शुल्क आकारून आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग विशेषतः विद्यार्थी व शेतकरी यांची लूट करत आहेत.यामुळे ङ्गङ्गनागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आलेली ही केंद्रेच आता लुटीचे साधन ठरत आहेत,ङ्गङ्ग असे तीव्र शब्दांत त्यांनी चिंता व्यक्त केली. असून सर्व सेतू सुविधा केंद्रांमध्ये दरफलक सक्तीने लावल्यास नागरिकांना नेमके दर माहित होतील आणि फसवणुकीला आळा बसेल, असेही गणेश शेवाळे यांनी नमूद केले. पाटोदा तहसील प्रशासनाने या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देत नियमित तपासणी करून दोषी केंद्र चालकांवर कठोर कारवाई करतील का असा मोठा प्रश्न गणेश शेवाळे यांनी उपस्थित केली आहे. तसेच अनेक सेतू सुविधा केंद्र हे स्वतः चे गाव सोडून पाटोदा शहरात थान मांडुन बसले आहेत

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन साजरा

पाटोदा। प्रतिनिधी येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ६ जून रोजी शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण संपन्न झाले. याप्रसंगी राष्ट्र ीय सेवा योजनेचे



कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी कृष्णा शेवंते, नितीन साळुंके, बाबासाहेब नाईकनवरे, जयराम राऊत, भाऊसाहेब यादव, श्रीकृष्ण यादव, माधुरी पुराणिक, रेणुका जाधव, दिलीप डाके, रोहित गायकवाड, अमोल आरे, अमोल रोमण, खाडे आदी कर्मचारी

# घातक हत्याराने जिवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण केल्या प्रकरणातील तीन आरोपांचा जमीन फेटाळला -ॲड. गणेश तावरे

बीड । प्रतिनिधी घातक हत्याराने जिवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण प्रकरण घटना अशी की फिर्यादी कृष्णा माणिक बर्डे, रा. धामणगांव ता.आष्टी जि. बीड दिनांक १४/०५/२०२५ रोजी धामनगांव येथे पाऊस आल्याने मी ०८ वाजेच्या सुमारास सायंकाळी सुनिल नवनाथ बर्डे यांचे घरी असतांना आरोपी १) रामा बबन गायकवाड, २) महादेव विठ्ठल बर्डे, ३) बाबु बबन गायकवाड, ४) ब्रम्हा विठ्ठल बर्डे, ५) सुभाष रायभान बर्डे,६) विष्णू बर्डे हे सर्वजण सुनिलच्या घरी आले जुन्या भांडणाचे कारण काढून सुनिल नवनाथ बर्डे यांना म्हणाले की, तु घराबाहेर चल असं म्हणताच सुनिल बर्डेला घराचे बाहेर ओढले व त्याला मुंडक्याला धरून रामा बबन गायकवाड याने खाली पाडले तेवढ्यात तेथे लगेच ब्रम्हा विठ्ठल बर्डे त्याच्या हातातील धारधार चाकूने सुनिल च्या डाव्या बाजुला पोटात मारून गंभीर जखमी केले व तेथे सुनिले हा बेशुध्द पडला. त्यानंतर कृष्णा बर्डे याला विष्णू विठ्ठल बर्डे, याने त्याचे हातातील धारधार तलवारीने कृष्णाच्या उजव्या गालावर मारून जखमी केले. तसेच महादेव विठ्ठल बर्डे याने व त्यांचे सोबत असलेले बाबु बबन गायकवाड, रामा बबन गायकवाड यादोघांनी कृष्णा व सुनिल बर्डे ला खाली पाडू न शस्त्राचा धाक दाखवून लाथा बुक्कयाने व चापटाने मारहाण केली. यावर आमचे भांडण चालु असताना तेथे अचानक सुभाष बर्डे,विष्णू बर्डे यांनी त्यांचे हातात लाकडी दांडे घेवून त्या दोघांनी कृष्णाला व सुनिल बर्डे ला पाठीत व कंबरावर मारहाण केली वरील आरोपी क्र. १ ते ६ यांनी कृष्णा बर्डे व सुनील बर्डेला शिवीगाळ करून तलवार,चाकू,लाकडी दांडेने जिवे मारण्याच्या उद्देशाने केलेल्या मारहाण प्रकरनी अंभोरा पोलिस स्टेशन ता.आष्टी जि. बीड भारतीय शस्त्रास्त्र(-ठ्ठ- -उढ)कायद्याच्या कलम ४,२५ व भारतीय न्यायाच्या कलम ११८(२), ११८ (१), १८९ (२), १९०, १९१ (३), ११५ (२), ३५२ आणि ३५१ (२) इछड कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला

# वाल्मिक कराडची दोषमुक्ती नको; फिर्यादीने अर्ज करुन सांगितलं कारण

बीड : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात बीडच्या जिल्हा व सत्र न्यायालयात झालेल्या सुनावणीनंतर आता या प्रकरणात म कोका अंतर्गत कारागृहात असणाऱ्या वाल्मीक कराडच्या वकिलांकडून दोष मुक्तीचा अर्ज करण्यात आलाय. त्यावर आता या प्रकरणातील फिर्यादींनी आपापले म्हणणे



न्यायालयाला अर्जाद्वारे मांडले असल्याची माहिती सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी दिली आह विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी बीड येथील विशेष मकोका न्यायालयात अर्ज दाखल केला असून या अर्जावर सुनावणी होणार आहे .नको का कायद्याअंतर्गत असणाऱ्या काही कलमामध्ये आरोपीच्या संपत्तीची जप्ती ही करता येते .त्यामुळे आता १७ तारखेला वाल्मीक कराडच्या संपत्तीच्या जप्तीवर काय निकाल समोर येतो हे महत्त्वाचं राहणार आहे . वाल्मीक कराडच्या वकिलाने मकोका अंतर्गत दाखल केलेल्या आरोपांपासून मुक्तता मिळावी यासाठी डिस्चार्ज अर्ज दाखल केला

## दोषमुक्तीच्या अर्जावर १७ जूनला सुनावणी

वाल्मीक कराडने जो दोषमुक्तीचा अर्ज न्यायालयात दाखल केला आहे त्याबद्दल फिर्यादींनी आपले म्हणणे दाखल केले असून सीआयडी एसआयटी कडून दोषारूक पत्र दाखल करण्यात आले आहे त्यात खंडणी ते खून हे दोन्ही प्रकरणे एकत्रित आहेत त्यामुळे खंडणीतूनच हा खून झाल्याचे सिद्ध झाले आहे .यारोपिना कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे असल्याचं फिर्यादींनी आपल्या अर्जात म्हटले आहे .संतोष देशमुख हत्या प्रकरणात गुंतलेल्या या सगळ्या आरोपींना फाशीची शिक्षा होणार आहे त्यातून कोणीच सुटणार नाही .आवाजा कंपनीच्या अधिकाऱ्यांना देखील कठोरातील कठोर शिक्षा व्हावी असेच म्हणणे असल्याचं सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख म्हणालेत .

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ९ जून २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## साने गुरुजी यांची विश्वप्रार्थना- खरा तो एकची धर्म

||करील मनोरंजन जो मुलांचे || ||जडेल नाते प्रभुशी तयाचे|| असे म्हणणारे साने गुरुजी म्हणजे एक आदर्श व्यक्तिमत्व.प्रेमळ शिक्षक, सहहृदयी माणूस,स्वातंत्र्य सैनिक,देशप्रेमी,थोर साहित्यिक,आंतरभारती सारखी देशव्यापी संकल्पना मांडणारे साने गुरुजी. एक आदर्श शिक्षक कसा असावा असा ज्यावेळी प्रश्न पंडतो तेव्हा एकच नाव समोर येते ते म्हणजे साने गुरुजी. महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्राला एका उच्चस्थानी नेणारे साने गुरुजी. साने गुरुजी यांचे व्यक्तिमत्व हे बहुआयामी होते ते एक आदर्श शिक्षक तर होतेच परंतु त्याच बरोबर वस्तीगृहातील मुलांची काळजी करणारे ते एक प्रेमळ मातृहृदयी होते. देशासाठी आपल्या प्राणाचे बलिदान देणारे देशप्रेमी होते मुलांसाठी आणि जेलमधील कैदीसाठी गोड गोड गोष्टी सांगणारे सखा सोबती होते.आपल्या संपूर्ण आयुष्यात त्यांनी कसलाच मोह धरला नाही. अतिशय साधे जीवन जगत संपूर्ण विश्वाला एक आदर्श घालून दिला.परंतु हेच साने गुरुजी शेतकऱ्यांचे आंदोलन असो या पंढरपूरचा विठ्ठल मंदिर प्रवेश असो यावेळी कठोर होताना ही आपल्याला दिसतात. अशा व्यक्तिमत्त्वाच्या भोवती आपला महाराष्ट्र आजही उभा आहे.त्यांच्या समग्र जीवनाचा आदर्श घेऊनच कितीतरी जणांनी शिक्षण क्षेत्रात तसेच स्वातंत्र्यलढ्यामध्ये प्रवेश केला आणि आपले जीवन देशासाठी समाजासाठी समर्पित केले. साने गुरुजी यांच्या व्यक्तिमत्त्वातला अजून एक मोलाचा पैलू म्हणजे त्यांचे लेखन.त्यांनी अनेक विषयांवर पुस्तके लिहिली. कथा,कादंबरी,कविता,गीते, ललित लेख,चरित्र लिहिली त्यांच्या कवितांचा या गीतांचा विचार केल्यास यातून आपल्याला व्यापक सामाजिक दृष्टी,राष्ट्रीय विचार,श्रमाचे महत्त्व, मानवता धर्म,अंधश्रद्धा विरोध विचार दिसून येतो. महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत ही गिते कविता आजही बोलली जात आहेत.यातील खरा तो एकची धर्म म्हणजे आपली विश्व प्रार्थना झाली आहे.आजही शाळा शाळामधून हीं प्रार्थना घुमत राहते.आणि विदयार्थ्यांच्या मनात घर करते.हीं कविता साने गुरुजी यांच्या पत्री या काव्य संग्रहातील असून मे १९३४ साली धुळे येथील तुरुंगात त्यांनी हीं कविता लिहिली होती. या मूळ कवितेत ऐकून अकरा कडवी आहेत. खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे| या जगात अनेक धर्म आहेत प्रत्येकाची उपासना पद्धती परंपरा वेगवेगळ्या आहेत परंतु साने गुरुजी आपल्याला संपूर्ण विश्वासाठी एकच धर्म सांगतात आणि तो खरा धर्म म्हणजे प्रेम,माणुसकी.आपण सर्वांनी एकमेकाला बंधू मानून एकमेकांवर प्रेम करावे. एकमेकाला सहकार्य करावे अशा प्रकारची मानव धर्माची व्याख्या ते करतात - जगी जे हीन अति पतित - जगी जे दीन पददलित तया जाऊन उठवावे जगाला प्रेम अर्पावे| - साने गुरुजी म्हणतात आपल्या समाजात काही आपलेच बांधव उपेक्षित असतील,गरीब असतील सामाजिक,आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतील या जाती व्यवस्थेमुळे ज्यांना जगण्याचे अधिकार हीं नाकारले असतील अशा आपल्या बांधवाना आपण हात दिला पाहिजे.त्यांच्या विकासासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत - त्याना सहकार्यचा हात देऊन त्या परिस्थितीतून वर काढले पाहिजे. - जयांना कोणी ना जगती - सदा जे अंतरी रडती - तया जाऊन सुखवावे जगाला प्रेम अर्पावे| तसेच ज्यांना या जगतात कोणी नाही जे अनाथ आहेत.ते आपले दुःख अंतरी ठेवून रडत आहेत त्यांना आपल्या प्रेमाची गरज आहे अशांना आपण प्रेम दिले पाहिजे त्यांना आपल्यात सामील करून एकत्र आले पाहिजे. त्यामुळे त्यांच्या जीवनात हसू येईल सुख येईल असा प्रयत्न आपण सर्वजण करूया. समस्ता धीर तो द्यावा सुखाचा शब्द बोलावा अनाथा साह्य ते द्यावे जगाला प्रेम अर्पावे| मानवता हाच खरा धर्म मानणारे साने गुरुजी समस्त बांधवाचा विचार करतात.आपण एकमेकांना मदत करावी धीर द्यावा एकमेकांशी संवाद साधावा एकमेकांशी बोलावे. संकटात असणाऱ्याला,अनाथ असणाऱ्याला सहकार्य करावे यातच आपला खरा धर्म आहे.आजच्या काळात विचार केल्यास गुरुजींचे हे शब्द किती महत्वाचे वाटतात.आज प्रत्येक जन कोपऱ्या कोपऱ्या विभागला गेला आहे.धर्म,जात,उच्च निच्च, गरीब श्रीमंत,शहरी ग्रामीण अशा या वातावरणात, हीं प्रार्थना आश्वासक ठरते. सदा जे आर्त अति विकळ जयांना गांजिती सकळ तया जाऊन हसवावे जगाला प्रेम अर्पावे| आपल्याला समाजात जे पीडित दुर्बल आहेत त्यांना काहीजण स्वार्थासाठी त्रास देतात. त्यांच्या विकल पणाचा फायदा घेतात हे चुकीचे असून अशा समाज बांधवाना आपण मदत केली पाहिजे.त्यांच्या दुःखात आपण सामील झाले पाहिजे त्यांच्या जीवनात हसू कसे येईल हा प्रयत्न केला पाहिजे. यालाच खरा धर्म म्हणता येईल. एखाद्याला हसणे,त्रास देणे हीं विकृती असून माणुस म्हणून आपण माणसाप्रमाणे वागले पाहिजे. मी सुखात आहे परंतु माझाच बंधू,शेजारी,नातलग, मित्र दुःखात आहे तर मी त्याचे दुःख थोडयाफार प्रमाणात हलके करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हीं आपली भूमिका असावी. कुणा ना व्यर्थ शिणवावे कुणा ना व्यर्थ हिणवावे समस्ता बंधु मानावे जगाला प्रेम अर्पावे| साने गुरुजी म्हणतात उगाच कोणाला त्रास देऊ नये तसेच त्याच्या परिस्थितीवरून, जात, धर्म,शारीरिक दुर्बलता यावरून हिनवू नये.प्रत्येक व्यक्ती हीं अनमोल असते तिच्यात चांगले गुण असतात त्याचा आपण आदर करावा सर्वाना आपले बांधव मानावे

# तरुणांनी व्यसनापासून दूर राहावे

साभार :- परमेश्वर बनकर, बीड 9503288282 तरुणांमध्ये व्यसनाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. तरुणांमधले वाढते व्यसनाचे प्रमाण हे आई वडिलांच्या आणि समाजाच्या चिंतेचा विषय बनत चालला आहे. अगदी नववी दहावी ची मुलं सुद्धा काही ठिकाणी सिगारेट, दारू व तत्सम बाबींचे व्यसन करताना दिसत आहे. तरुणांसाठी व्यसन हा एन्जॉय चा विषय झाला आहे.

व्यसनाच्या आहारी गेलेल्या तरुणांचे करियर बरबाद होत आहे. व्यसनामुळे तरुणांच्या भांडनात वाढ होत आहे, आपापसातले वाद वाढत आहेत, तरुण रागीट बनत चालले आहेत, व्यसनाच्या आहारी गेलेल्या तरुणांना आई वडिलांचे सुद्धा भान राहिलेले नाही. व्यसन करण्यासाठी पैसे दिले नाही म्हणून आई वडिलांसोबत भांडणं करणारे तरुण पाहायला मिळत आहेत.

व्यसनाच्या आहारी गेलेले विवाहित तरुण बायको मुलांना सुद्धा विचारायला तयार नाहीत. व्यसनासाठी घरातील वस्तू विकणे, शेती विकणे सोनं मोडणे अश्या प्रकारचे उद्व्याप करताना ही मंडळी पाहायला मिळत आहे.

खरंतर मुलांवर लहान पणा पासूनच संस्कार करणे गरजेचे आहे. मुलांना परिस्थिती जाणीव करून देणे गरजेचे आहे, व्यसनाचे होणारे घातक परिणाम समजावून सांगणे गरजेचे आहे. मुलांना वाचन संस्कृती कडे घेऊन जाणे, त्यांच्या मध्ये प्रेम आपुलकी, बंधुता, आदर इत्यादी मूल्यांची पेरणी करणे गरजेचे आहे.

व्यसनामुळे सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक जीवन कसं उध्वस्त होतं याबद्दल त्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.मुलांचे नाहक हट्ट पुरवणे, एक वस्तू मागितली असता दोन वस्तू देणे, सर्व गोष्टी लगेच उपलब्ध करुन दिल्याने मुलांना संयम बाळगण्याची सवय राहत नाही, एखादी गोष्ट टाईमावर नाही मिळाली की लगेच ते चिडचिड करायला लागतात, खूपच हट्टी आणि रागीट असतील तर आत्महत्या करण्या इतपत सुद्धा पाऊल उचलतात. म्हणून मुलांना परिस्थितीची जाणीव करून देणे, त्यांच्या मध्ये संयमी पणा निर्माण करणे खूप गरजेचे आहे. मुलांच्या आई वडिलांनी दोन पैसे कमी कमावले तरी चालतील परंतु मुलांच्या संस्काराकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आई वडिलांनी पैसा, संपत्ती कमवण्याच्या नादात मुलांकडे लक्ष दिले नाही तर तेच मुलं आई वडिलांनी कमावलेली संपत्ती काही दिवसातच संपवून टाकतात. म्हणून पालकांनी केवळ भौतिक सुखाच्या मागे न पळता मुलांना चांगले संस्कार शिकवले पाहिजेत किंवा चांगले मूल्य शिकवणाऱ्यांच्या सहवासात पाठवले पाहिजे. तरच उद्याची पिढी आदर्श आणि मानवतावादी निर्माण होईल..

# श्री क्षेत्र चाकरवाडी येथे पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेचा व महाप्रसादाचा माजलगाव मतदारसंघातील भाविकांनी लाभ घ्यावा - मोहनराव जगताप



माजलगाव (प्रतिनिधी) दि.०७ : श्री क्षेत्र चाकरवाडी येथील वैकुंठवासी संत माऊली महाराज यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ श्री क्षेत्र चाकरवाडी येथे ८ जून पासून सुरू होणाऱ्या पुज्य पंडित प्रदीप मिश्राजी यांच्या श्रीमुखातून महाशिवपुराण कथा ऐकण्याचे अभूतपूर्व असे आयोजन करण्यात आले आहे. ही कथा ऐकण्यासाठी भाविक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणार आहेत. तसेच माजलगाव बस स्थानक येथून ८ जून ते १४ जून पर्यंत सकाळी ७:३० ते ९ वाजेपर्यंत तसेच परत



येताना सुद्धा बसची सेवा उपलब्ध करण्यात आलेली आहे. माजलगाव तालुक्यास या अभूतपूर्व शिवपुराण कथेच्या कार्यक्रमाची सेवा करण्याचा मान ९ जून सोमवार रोजी मिळालेली आहे, यावेळी दिवसभर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे . माजलगाव विधानसभा मतदारसंघातील भाविकांनी या महाशिवपुराण कथेचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे अवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते तथा छत्रपती सह. साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी केले आहे.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघ निराधार, अबला अपंग कुटुंबाच्या अडीअडचणीला कायम उभा नानासाहेब घोडके



माजलगाव दि ६ (बातमीदार) राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप साहेब यांच्या आदेशानुसार आणि प्रदेश अध्यक्ष माधवराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गोपीनाथ गुरव परभणी यांनी बीड येथे जिल्हापरिषद (कन्या शाळा बीड)आवारात ताडपत्री व पत्र्याच्या शेडमध्ये निर्धार, अबला, दोन्ही पायांनी अपंग चर्मकार समाजाचे पती पत्नी रहात आहेत हे मला कळले आणि मी स्वतः त्यांची भेट घेतली भानुदास विठ्ठल मुजमुले वय ६२ वर्षे मुळ गाव एकुरका ता. केज हाल्ली मुक्काम बीड हे दोन्ही पायाने अपंग आहेत सौ. शोभा भानुदास मुजमुले वय ५४ वर्षे या पण दोन्ही पायाने अपंग आहेत त्यांना तेजस्विनी नावाची १६ वर्षे वयाची एक मुलगी आहे ती १० वी ला आहे हे अपंग कुटुंब मुलीचे शिक्षण आणि संसाराचा गाडा परीकष्टाने चालवत आहेत या अबला निराधार कुटुंबांची परीस्थिती पाहुण माझ्या मनाला खुप वेदना झाल्या त्यांच्या सोबत चर्चा धीर देऊन राष्ट्रीय चर्मकार महासंघ कुठल्याही अडचणीला पाठीमागे उभा राहिला असे बोलून त्यांना एक महिन्याची राशन पाण्याची व्यवस्था केलीत् त्यामध्ये गहू आटा,तुरदाळ, साखर, तांदूळ, शेंगदाणे,तेल, अंगाच्या व कपड्यांच्या साबणी,चाहा पत्ती,मीठ पुढे एक किलो,दोन किलो,पाचा किलो अशा प्रमाणात त्यांना देण्यात आले

जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, कर्मचारी जिल्हाध्यक्ष सुनील जी माने साहेब, जिल्हा सल्लागार दासराव गोरे साहेब , गोपीनाथ गुरव आणि माझे विश्वासु ,हकेला धावणारे यशराज बामणे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत देऊन या कुटुंबा सोबत चर्चा करीत असताना खुप काही वाईट प्रसंग सांगितले आता थकलो आहोत मुलीचे शिक्षण कसे करावे रहाण्यासाठी घर नाही निवारा नाही हलाखीचे जीवन जगत आहेत समाजाकडून व शासनाकडून अपेक्षा व्यक्त केल्या मुलीला घेऊन ह्या उघड्या आवारात रहात आहोत विशेष म्हणजे शोभा मुजमुले ह्या अपंगत्वावर मात करून एम पी एस सी परीक्षा पास आसुण ओरल आणि अपंगत्वामुळे नौकरी नाकारण्यात आली तरी पण हिम्मत देऊन आपला संसाराचा गाडा ओढत आहेत तरी समाज बांधवांना विनंती करण्यात येते की या कुटुंबास जी काय मदत करता येईल ती करावी आणि त्यांना हाक्काची जागा कसी मीळवुन देता येईल त्यासाठी प्रयत्न करावे हि कळकळीची विनंती नानासाहेब घोडके यांनी प्रसार माध्यमातून केली आहे

# घाटनांदुर-श्रीगोंदा रेल्वे मार्गासाठी डॉ.आदित्य पतकराव यांचा पुढाकार

अंबाजोगाई । प्रतिनिधी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या घाटनांदुर- श्रीगोंदा रेल्वे मार्ग मंजूर करण्याच्या मागणीसह इतर दोन मागण्यांसाठी महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक राज्यांचे प्रादेशिक रेल्वे सल्लागार डॉ. आदित्य पतकराव यांनी आग्रह धरला. आज मुंबईत मध्य रेल्वे मुख्यालयात झालेल्या घ्या बैठकीत या राज्याचे प्रादेशिक सल्लागार म्हणून डॉ.आदित्य पतकराव यांची विशेष उपस्थिती होती. या बैठकीत मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापक धर्मवीर मिना जी यांनी प्रत्येक सदस्यांनी फक्त तीन महत्त्वपुर्ण प्रस्तावाच्या सुचेना कराव्यात असे आवाहन केल्यानंतर या बैठकीत बोलताना घाटनांदुर श्रीगोंदा या रेल्वे मार्गाचा प्रस्ताव तत्कालीन रेल्वेमंत्री या. सुरेश प्रभू यांच्या कार्यकाळात पुढे आला होता. त्यांच्याच कार्यकाळात या नवीन रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण ही पुर्ण करण्यात आले असून आता हा नवीन रेल्वेमार्ग लवकरात लवकर मार्गी लावावा असा आग्रह त्यांनी या बैठकीत धरला. या सोबतच सोलापूर विभागातील मुरुड हे स्थानक एक महत्त्वाचे स्थानक असून मोठे व्यापारी केंद्र आहे.या स्थानकातुन दररोज २ हजार प्रवासी मोठ्या शहराकडे प्रवासाची जातात. या पार्श्वभूमीवर या स्थानकाच्या सर्वांगिण विकासासाठी आणि प्रवासी सुविधा वाढविण्यासाठी एक प्रस्ताव आपण सादर केला असून सदरील प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करण्यात यावी. या सोबतच तिसरी मागणी करतांना प्रादेशिक सदस्य डॉ. आदित्य पतकराव यांनी आपत्कालीन तिकिटासाठी अर्ज प्रक्रियेचे डिजिटायझेशन करण्यात यावे अशी मागणी केली आहे. सध्या सदस्यांना आपत्कालीन तिकिटासाठी अर्ज करावयाचा असल्यास तो फॅक्स ने पाठवण्याची अट आहे. मात्र आजच्या डिजिटल युगात फॅक्स सेवा सर्वसामान्यांसाठी सहज उपलब्ध होत नाही. माझा आग्रह आहे की, फॅक्स ऐवजी इमेल किंवा व्हाटसऍप सारख्या डिजिटल माध्यमांद्वारे अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया लागू करण्यात यावी, जेणे करून ही सुविधा अधिक सुलभ, वेगवान आणि प्रभावी होईल. आज झालेल्या घ्या बैठकीत प्रादेशिक सदस्य डॉ. आदित्य पतकराव यांनी सुचवलेल्या तीन ही मागण्या अत्यंत प्रमाणे मांडण्यात आल्या असून मराठवाडा आणि सोलापूर विभागातून या मागण्यांचे जोरदार स्वागत करण्यात येत आहे. १९७५ च्या केंद्रीय मंत्रीमंडळात सुरेश प्रभू यांना रेल्वे मंत्रालयाचा कारभार पाहण्याची संधी मिळाली. सुरेश प्रभू यांनी मंत्रीपदाचा



पदभार स्वीकारताच अंबाजोगाई शहराला रेल्वे मार्गाच्या नकाशावर आणण्याच्या कामास गती मिळाली. आणि घाटनांदुर श्रीगोंदा हा नवा रेल्वे मार्ग प्रस्तावित झाला. हा नवीन रेल्वेमार्ग घाटनांदुर, अंबाजोगाई, केज, नेकनूर, मांजरसुंबा आणि श्रीगोंदाङ्कङ्क अशा पध्दतीने प्रस्तावित करण्यात आला होता. सुरेश प्रभू एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी या रेल्वे मार्गाला मंजुरी ही दिली. पुढे २०१५ साली या रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षण साठी ३४ लाख ५ हजार रुपयांचा

# वय कमी आणि ताकद जास्त बैलजोडीला लाखांचा भाव



प्रतिनिधी सौरभ आडे* बाजारात बैलाच्या किमती वाढल्यामुळे शेती मशागत, पेरणीसाठी ट्रॅक्टरला सर्वाधिक पसंती दिली जात आहे तरी काही शेतकरी अजूनही आंतरमशागतीसाठी पारंपारिक बैल जोडीवर विश्वास ठेवतात विशेषता कमी वयाची आणि ताकदवान बैल जोडी लाख रुपयांच्या घरात विकली जात आहे तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे नांगरणी व करणे फवारणी आधी सर्व कामासाठी ट्रॅक्टरचा सर्रास वापर होतो मात्र अंतर मशागत किंवा मधल्या काळातील शेती कामांसाठी काही शेतकरी आजही बैलजोडीचाच आधार घेतात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अनेक शेतकरी नवीन बैल जोडी किंवा एखादा बैल खरेदी करतात सध्या जनावरांच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे मध्यम स्वरूपाच्या गावरान बैल जोडीची किंमत सुमारे ५० ते ७० हजार रुपयापर्यंत जाते तर दर्जेदार आणि ताकदवान बैलजोडी ७० हजार पासून एक लाख रुपयापर्यंत विकली जात आहे विशेष म्हणजे वयाने लहान व शरीराने मजबूत अशा बैलांना ग्रामीण बाजारपेठेत मागणी आहे ट्रॅक्टर द्वारे पिकात डवरणी व इतर मशागतीची कामे नीट होत नाहीत त्यामुळे अनेक शेतकरी आजही आंतरमशागतीसाठी बैलजोडीचा वापर करतात

# उपसभापती मोरे नाना यांचेवर शुभेच्छांचा वर्षाव - वाढदिवसानिमीत्त सर्वच क्षेत्रातील मान्यवरांकडुन सत्कार



माजलगाव, प्रतिनिधीः बहुजन विकास मोर्चाचे नेते, माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, बाबुराव पोटभरे यांचे खंदे समर्थक श्रीहरी नाना मोरे यांच्या वाढदिवसानिमीत्त राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच मान्यवरांकडुन शुभेच्छांचा वर्षाव झाला तर दिवसभर सत्कार व सोशल मिडीयावरही शुभेच्छांचा धुमाकुळ दिसुन आला अनेकांनी भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणुन देखील शुभेच्छा दिल्या. सर्वसामान्यांच्या कुठल्याही कामात अपेक्षेविना तुमचं काम होउन जाईल असं बोलन व ते काम करून घेण हा स्वभाव असल्याने जिल्हाभरात उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांच्या चाहत्यांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. लोक कमावणारा नेता, समाजात देखाव्यासाठी मोठेपणा न करता बहुजन, वंचित, उपेक्षित व सर्वच जाती धर्मातील लोकांच्या कामांना न्याय देण्यासाठी झटणारे मोरे नाना आज लोकप्रिय झाले आहेत. समाजात तुमचं असणारं प्रामाणिक कामं, अन्यायाविरूध्द लढणारा निडर स्वभाव, राजकारणातील भुमिका अशी वैशिष्टे श्रीहरी नाना मोरे यांची आहेत. दि. 7 जुन रोजी वाढदिवसानिमीत्त दिवसभर त्यांचे ठिकठिकाणी सत्कार झाले तर दिवसभर देखील तरूणांसह सर्वच जाती धर्मातील लोकांची त्यांच्या निवासस्थांनी ये - जा होती. अनेकांनी भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणुन देखील मोरे नाना यांना शुभेच्छा दिल्या. पुरूषोत्तमपुरी, सादोळा, केसापुरी, फुलेपिंपळगाव, गंगामसला, खरात आडगाव, कल्याणनगर, लवुळ, राजेवाडी, पुरूषोत्तमपुरी सह तालुक्यातील अनेक गावातील लोकांनी यथोचित सत्कार करत नानांप्रती असलेले प्रेम व्यक्त केले तर किट्टी आडगावात तरूणांनी तर कार्यक्रम घेवुन सत्कार केला. यात राजकीय नेते, कार्यकर्ते, पत्रकार, डॉक्टर, वकील, सर्व स्तरातील सर्व जाती धर्मातील प्रतिष्ठीत नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी व सत्कारासाठी मोठी गर्दी केली होती त्याचबरोबर बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी देखील पत्राव्दारे मोरे नाना यांना शुभेच्छा दिल्या.

# कारंजात सात कोटीच्या विकासकामाचेभूमिपूजन आमदार सई ताई डहाके यांच्या हस्ते भूमिपूजन



कारंजाः जिल्हा नियोजन समिती वाशिम अंतर्गत ८ जून रोजी कारंजा नगरपरिषद हद्दीत सात कोटी रुपयांचा विविध विकास कामाचे भूमिपूजन आमदार सई ताई प्रकाश दादा डहाके यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी नगराध्यक्ष नरेंद्र गोलेच्छा व दत्तराज डहाके तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपच्या शहराध्यक्ष प्राजक्ता माहितकर उपस्थित होते कार्यक्रमाला सकाळी ९:०० वाजता पासून सुरुवात झाली त्यानंतर स्थानिक लक्ष्मी नगर मधील संतोष डाकुलकर ते गजानन पवार घरापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे किंमत ४२ लाख ३७ हजार ४६६ रुपये सकाळी ९:३० वाजता सुपर दास नगर मधील गुरुदेव घर ते देवळे घरापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे ६१ लाख १९ हजार ३६५ रुपये सकाळी १०:०० वाजता रमाबाई कॉलनी मधील गजानन काजळे घर ते सावंत घर ते दिलीप चव्हाण यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे किंमत ५८ लाख ३ हजार ४४६ रुपये सकाळी १०:३० वाजता दत्त कॉलनी येथील देशमुख घर ते खंडागळे ते बनसोड नको कॉलनी येथे कॉम्प्युटर प्रस्तावनाली बांधकाम करणे किंमत अंदाजे ४९ लाख ४६ हजार ८९० रुपये सकाळी १०:४५ वाजता महावीर कॉलनी मुर्तीजापुर रोड येथील कथे ते बोरकर यांचे घरापर्यंत काँक्रीट प्रस्तावनाली बांधकाम करणे किंमत ४८ लाख १३ हजार ६२३ रुपये आदी विविध विकास कामाचे भूमिपूजन करण्यात आले




माजलगाव.. राम व लखन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना बीड नेता चे संपादक प्रचंड सोळंके लोकरंजन संपादक परमेश्वर सोळंके निर्भीड पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब आढागळे निर्भीड पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष अमर साळवे व इतर

# जॉय सामाजिक संस्थेचा वर्धापन दिन आणि राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा अस्मिता भवन येथे संपन्न







गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी मुंबईतील जॉय सामाजिक संस्थेच्या १० वा वर्धापन दिनाच्या निमित्ताने राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा शनिवार दिनांक ७ जून २००५ रोजी सायंकाळी जोगेश्वरी येथील अस्मिता भवन सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रात कार्य करणाऱ्या विविध संस्था, संघटना, व्यक्तींचा मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला. यावेळी विचारमंचावर प्रमुख अतिथी म्हणून जोगेश्वरी भूषण डॉ एम डी वळंजू, कामगार नेते अविनाश दौंड, उच्च न्यायालयाचे वकील जगदीश जायले, समुपदेशक व मार्गदर्शक ॲड रूषीला रिबेलो, जेष्ठ पत्रकार राजेंद्र घरत, कुर्ला भूषण सत्येंद्र सामंत, डॉ महेश अभ्यंकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ वळंजू हे होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांनी द्वीप प्रज्वलक करून तसेच योगिता हिरवे यांच्या स्वागत गीताने आणि भूषण मुळे यांच्या शिव गर्जनेने करण्यात आली. प्रास्ताविक जॉयचे संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे यांनी केले तर सूत्रसंचालन नवी मुंबई समन्वयक वैभव पाटील आणि कार्यधाक्षा असूंता डिसोझा यांनी केले. यावेळी जॉयच्या सामाजिक कार्याचा मागोवा घेणाऱ्या विशेषांकाचे प्रकाशनदेखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जॉय संस्थेच्या वतीने अस्मिता शाळेचे संस्थापक दादा पटवर्धन, शिक्षक नेते जनार्दन जंगले आणि जेष्ठ वृत्तपत्रलेखक विश्वनाथ पंडित यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही जॉयच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून समाज विविध क्षेत्रांत असामान्य कामगिरी करणाऱ्या जवळपास दीडशे व्यक्ती संस्थांना आदर्श समाजसेवक, आदर्श पत्रकार, आदर्श शिक्षक, आदर्श संपादक, आदर्श मुख्याध्यापक, आदर्श शाळा, आदर्श माता, आदर्श गृहिणी, आदर्श दिवाळी अंक, आदर्श तिकीट निरीक्षक, आदर्श शाखाप्रमुख इत्यादी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. उपस्थित सर्वच मान्यवर प्रमुख पाहुण्यांनी जॉय सामाजिक संस्था करत असलेल्या कार्याचे कौतुक करत प्रामाणिक व शुद्ध हेतूने समाजातील वंचित, गरीब व गरजू घटकांना सभासदांच्या वर्गणीद्वारे आवश्यक सहकार्य करणाऱ्या जॉय सारख्या संस्थांची समाजाला गरज असल्याचे मत व्यक्त केले. जवळपास दोन तास चाललेला हा जॉय चा हा वर्धापनदिन व पुरस्कार वितरण सोहळ्याचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जॉयचे पदाधिकारी व सभासद असूंता डिसोझा, वैभव पाटील, भूषण मुळे, चंद्रशेखर सावंत, शीला येरागी, छाया राणे, श्रद्धा कारके, योगिता हिरवे, मीना भूतकर, दत्ता रातवडकर, रोशनी ठोकळे, सृष्टी मुळे, विजय फणसेकर यांनी अथक परिश्रम घेतले. हा नयनरम्य सोहळा यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व मान्यवर, जॉयचे पदाधिकारी, सभासद, देणगीदार, उपस्थित पुरस्कार्थी आणि पत्रकार बांधवांचे जॉयचे अध्यक्ष गणेश हिरवे यांनी आभार मानले.

# श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथेस प्रचंड जनसमुदाय माऊली दादाच्या जयघोषात शिवमहापुराण कथेस सुरुवात

## पहिल्याच दिवशी ३ लाख पेक्षा जास्त भाविक उपस्थित मंत्री पंकजाताई मुंडे यांची उपस्थिती



चाकरवाडी ( प्रतिनिधी) विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्यात प. पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस प्रचंड जनसमुदायांच्या उपस्थित.

माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री ह.भ.प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर व ह.भ.प. नारायण महाराज भाऊ यांच्या हस्ते शिवमहापुराण ग्रंथ पूजन करण्यात आले मंत्री पंकजाताई मुंडे यांनी चाकरवाडी येथे प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस भेट दिली व शिवमहापुराण कथेस आलेल्या भाविक भक्तांचे चाकरवाडी येथे स्वागत केले. तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांनी शिवमहापुराण कथेस व माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास आलेल्या भाविक भक्तांना आशिर्वाद दिले. सर्वांनी माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात नामस्मरण, अभंग संकीर्तन,शिवमहापुराण कथेचा लाभ घ्यावा असे महादेव महाराज तात्या यांनी आव्हान केले .सद्गुरु संत ज्ञानेश्वर माऊली दादाच्या जय जय घोष व हर हर महादेव जय घोषणे आंतरराष्ट्रीय शिवकथाकार प. पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांच्या शिवमहापुराण कथेस सुरुवात झाली .

महाराष्ट्रातील भक्तीच माहेरघर श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथेस सुरुवात झाली पहिल्याच दिवशी भाविक भक्तांचा महापूर चाकरवाडी येथे आला , सुमारे 3 लाख पेक्षा अधिक जनसागर श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथेस उपस्थित होते . संत महंतांच्या उपस्थितीत शिवमहापुराण कथेस तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प. पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांची शिवमहापुराण कथा सुरू झाली पुढील सात दिवस शिव महापुराण कथा सुरू राहणार आहे भाविक भक्तांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास करण्यात आले

# सामाजिक न्याय विभागाला कोणी न्याय देता का न्याय??

# सामाजिक न्यायमंत्र्यावर टाहो फोडण्याची वेळ ;

## लाडकी बहिण योजनेसाठी सामाजिक न्याय ८२0 कोटी ६0 लाखांचा निधी वळवला :- डॉ.गणेश ढवळे

बीडः-( दि.०७) लाडकी बहिण योजनेसाठी राज्य सरकारने पुन्हा एकदा सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती घटकांसाठी असलेला ४१० कोटी ३० लाखांचा निधी वळवला असुन यावरून सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाटांनी जाहिररित्या अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केल्याने एकंदरीतच सामाजिक न्याय विभागाला कोणी न्याय देता का न्याय असे म्हणण्याची वेळ आल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले असुन या आधीही ४१० कोटी ३० लाख रुपयांचा निधी वळविण्यात आला होता. आतापर्यंत सामाजिक न्याय व विशेष विभागाचा एकुण ८२० कोटी ६० लाख रुपये वळविण्यात आले आहेत.आदिवासी विभागाचा ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी ३ वेळा वळविण्यात आला असून एकुण आदिवासी विभागाचा आतापर्यंत १ हजार ७ कोटी रुपये वळविण्यात आले आहेत. एकंदरीतच सामाजिक न्याय व आदिवासी विभागाचे मिळुन लाडकी बहिण योजनेसाठी १८२७ कोटी ७० लाख रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वळविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सामाजिक न्याय विभागाला मागील ५ वर्षाच्या तुलनेत यावर्षीची ७,३१७ कोटी रुपयांचा निधी कमी मिळाला आहे. वर्षभरात तब्बल



६ हजार ७६५ कोटी रुपयांचा सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला जाणार आहे. हा अनुसूचित जाती व आदिवासी समाजातील लोकांवर अन्याय असुन याविरोधात आंदोलनाचा ईशारा डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, पांडुरंग हराळे, शेख मुबीन,रामधन जमाले यांनी दिला आहे. सविस्तर माहितीस्तव आदिवासी आणि सामाजिक न्याय विभागाच्या लोकसंख्येनुसार निधी वितरित करण्यात यावा असा नियम आहे. मात्र सामाजिक न्याय विभागात कमी निधी मिळाल्याचं पहायला मिळत आहे .महाराष्ट्रात एकूण ११.२३ कोटी लोकसंख्या आहे. त्यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या १.३३ कोटी आहे. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ११.८४% अनुसूचित जातीची लोकसंख्या आहे. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाला एकूण तरतुदींच्या ११.८४% निधी मंजूर होणे अपेक्षित असताना ८ ते साडे ८ टक्के निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे २.४४ % तूट आहे.

सामाजिक न्याय विभागाला ७३१४ कोटी कमी निधी यावर्षी सामाजिक न्याय विभागाला २९ हजार ९७२ कोटी रुपये मंजूर झाला आहे. त्यातील जवळपास ५००० कोटी लाडकी बहीण आणि इतर योजनांसाठी तरतूद केली आहे. त्यामुळे २९ हजार ९७२ कोटी पैकी २२ हजार ६५८ कोटी सामाजिक न्याय विभागाच्या योजनांसाठी आहे. त्यामुळे एकूण बजेटच्या ७३१४ कोटी रुपयांची तूट पहायला मिळत आहे.

मागील ५ वर्षात प्रत्यक्षात आलेली तुट ( कोटीत)

सन २०२१-२२. ४,७०५ कोटी
सन २०२२-२३. ५,४७० कोटी
सन २०२३-२४. ६४७६ कोटी
सन २०२४-२५ ६७६४ कोटी
सन २०२५-२६. ७३१४ कोटी

मागील ५ वर्षातील आकडेवारी पाहता यावर्षी सर्वाधिक तुट सामाजिक न्याय विभागाची पहायला मिळत आहे. त्यामुळे वित्तमंत्री अजित पवार यांनी केलेला दावा आणि प्रत्यक्षात मिळालेला निधी यात मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. यावर्षी सामाजिक न्याय विभागाला २२ हजार ६५८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.लाडकी बहिण आणि ईतर योजनांच अतिरिक्त मिळुन २९हजार ९३२ कोटींचा निधी आहे.तरीही सामाजिक न्याय विभागामध्ये ७३१४ कोटी म्हणजेच एकूण बजेटच्या २.४४ टक्के निधी कमी प्राप्त झालेला आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
आंतरराष्ट्रीय

# मणिपूर पुन्हा अशांत! पाच जिल्ह्यांत इंटरनेट बंद, या कारणामुळे हिंसेचे लोण पसरले

मणिपूरमध्ये (Manipur) पुन्हा एकदा तणाव वाढला आहे. मणिपूर गेल्या काही वर्षांपासून सातत्याने धुमसत आहे. येथील तणाव निवाळण्याची चिन्ह दिसत नाही. राज्यातील पाच जिल्हे इंफाल पश्चिम, इंफाल पूर्व, थौबल, बिष्णूपूर आणि ककचिंगमध्ये इंटरनेट आणि मोबाईल सेवा पाच दिवसांसाठी बंद करण्यात आली आहे. मैतई समाजाचे नेते अरामबाई तेंगगोल (Maitai Leader Arrest) यांच्या अटकेनंतर लोक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी अनेक ठिकाणी तीव्र प्रदर्शन केले. काही ठिकाणी जमाव हिंसक झाला. असामाजिक तत्त्वांचा मोठा डाव अरामबाई यांच्या अटकेच्या आडून काही असामाजिक तत्त्वे समाज माध्यमांचा वापर करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्यासाठी प्रक्षोभक संदेश, चित्रे आणि व्हिडिओ प्रसारित करण्यात येत आहे. त्यामुळे शांतता प्रक्रियेला गालबोट लागण्याची शक्यता आहे. गृह विभागाचे सचिव एन. अशोक



म्हणाले की या घटनांमुळे कोणतीही पूर्वसूचना न देता आपत्कालीन परिस्थितीत इंटरनेट सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यामुळे असामाजिक तत्त्वे त्यांचा अजेंडा राबवू शकणार नाहीत. तर नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. आता हिसेंचे लोण पाच जिल्ह्यात शनिवारी रात्री उशीरा मणिपूर पोलिसांनी अरामबाई तेंगगोल यांना अटक केली. अनेक लोक त्यांच्या अटकेच्या निषेधार्थ रस्त्यावर उतरले. क्वाकईथेल आणि युरिपोक परिसरात लोकांनी रस्त्यावर टायर आणि जुने फर्निचर जाळून विरोध प्रदर्शन केले. त्यांनी अरामबाई यांना सोडण्याची जोरदार मागणी केली. काही ठिकाणी सुरक्षा यंत्रणा आणि आंदोलकांमध्ये बाचाबाची आणि धक्काबुक्की झाल्याची माहिती समोर येत आहे. तर प्रशासनाने या जिल्ह्यात अतिरिक्त सुरक्षा दलांना पाचारण केले आहे. या नेत्याची अटक का करण्यात आली. त्याच्यावर काय आरोप आहेत, हे समोर आलेले नाही. दोन वर्षांपासून मणिपूर अशांत मणिपूर 3 मे 2023 पासून अशांत आहे. मैतई बहुल आणि कुकी बहुल परिसरात हिंसा झाली. तेव्हापासून हे दोन्ही समाज एकमेकांवर आरोप करत आहेत. त्यातून त्यांच्यात हिंसा झाली आहे.

# धक्कादायक! राष्ट्रपतीपदाच्या उमेदवाराच्या डोक्यातच गोळी झाडली, प्रचारादरम्यान घडला प्रकार

कोलंबियामध्ये 2026मध्ये राष्ट्रपतिपदाची निवडणूक होणार आहे. मिगुएल उरीबे हे विरोधी सेंट्रो डेमोक्रॅटिको कॉन्सर्व्हेटिव्ह पार्टीचे सदस्य आहेत. या निवडणुकीत ते राष्ट्रपतिपदाचे प्रबळ दावेदार मानले जात होते. याच निवडणुकीच्या निमित्ताने ते बोगोटामध्ये एका सभेला संबोधित करत होते. दरम्यान, त्यांच्यावर मागून गोळ्या झाडण्यात आल्या. स्थानिक मीडियानुसार, मिगुएल यांना तीन गोळ्या लागल्या आहेत. त्यापैकी एक गोळी त्यांच्या डोक्यात लागल्याचे सांगितले जात आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. आईचीही 34 वर्षांपूर्वी झाली होती हत्या मिगुएल उरीबे यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात बोगोटा कौन्सिलचे सदस्य म्हणून झाली होती. ते अवघे 39 वर्षांचे आहेत. ते कोलंबियाचे माजी राष्ट्रपती जूलियो सेझर टर्बे यांचे नातू आहेत, जे 1978 ते 1982 पर्यंत कोलंबियाचे 25 वे राष्ट्रपती होते. त्यांची आई डायना टर्बे एक पत्रकार होत्या. त्यांची हत्या 34 वर्षांपूर्वी बोगोटा




शहरात झाली होती. 1991 मध्ये ड्रग माफियाने त्यांचे बोगोटामधून अपहरण केले होते. त्या सातत्याने ड्रग तस्करी आणि संघटित गुन्ह्यांविरुद्ध लिहित होत्या. वाचा: अपने अम्मी-अब्बू की कुर्बानी दो...; पाकिस्तानी क्रिकेटपटूने ईदला दिली बैलाची कुर्बानी, नेटकरी संतापले या नेत्यांवरही झाले होते हल्ले 13 जुलाई 2024 रोजी अमेरिकेचे राष्ट्रपतिपदाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर पेनसिल्व्हेनियाच्या बटलर शहरात हल्ला झाला होता. तेही एका निवडणूक रॅलीला संबोधित करत होते. त्यावेळी त्यांच्यावर गोळी झाडण्यात आली होती, जी त्यांच्या कानाजवळून गेली होती. या हल्ल्यात डोनाल्ड ट्रम्प थोडक्यात बचावले होते. हल्ला केलेल्या आरोपीला सुरक्षा कर्मचाऱ्यांनी घटनास्थळीच ठार केले होते.जपानचे माजी पंतप्रधान शिंजो आबे यांच्यावरही जुलै 2022 मध्ये नारा शहरात निवडणूक सभेत गोळी मारण्यात आली होती. त्यांच्यावरही मागून गोळीबार करण्यात आला होता. हल्लेखोराने त्यांच्यावर दोन गोळ्या झाडल्या होत्या. एक गोळी त्यांच्या मानेवर आणि दुसरी छातीतून आरपार गेली होती. रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता.

# अमेरिकेला धान्यासाठी वणवण भटकावे लागले असते,



युद्धे केवळ दारुगोळ्याने लढली जातात असे तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही चुकीचे आहात. चीनने अमेरिकेकडून सूड घेण्यासाठी असा मास्टर प्लॅन तयार केला होता की, ते यशस्वी झाले असते तर महासत्ता अमेरिकेला धान्याची लालसा लागली असती. ड्रॅगनला जास्त पैसा किंवा संसाधनांची गरज नसते आणि एका झटक्यात अमेरिकेचे मोठे नुकसान झाले असते. कृषी दहशतवाद पसरवण्याचा कट रचल्याच्या आरोपाखाली FBI ने डेट्रॉयटमध्ये एका चिनी नागरिकाला अटक केली आहे. एफबीआयचा दावा आहे की, लियू फुसेरियम ग्रॅमिनिअरम नावाच्या धोकादायक बुरशीची चीनमधून अमेरिकेत तस्करी करण्यात आली होती. ही एक बुरशी आहे जी पिकांना रोग निर्माण करते आणि त्यांचा नाश करते. त्याचा वापर कृषी दहशतवादाचे हत्यार म्हणून केला जातो.

# इम्रान खान तुरुंगातून सुटणार? प्रकरणाची 11 जूनला सुनावणी



पाकिस्तानातून महत्वाची बातमी समोर येत आहे. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि तहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) चे संस्थापक इम्रान खान हे जेलमधून सुटण्याची शक्यता आहे. अल-कादिर ट्रस्ट प्रकरणी ११ जून रोजी इस्लामाबाद उच्च न्यायालयात इम्रान खान आणि त्यांच्या पत्नी बुशरा बीबी यांच्या शिक्षेच्या निलंबनाच्या याचिकांवर सुनावणी होणार आहे. यात त्यांना जामीन मिळण्याची शक्यता आहे. इम्रान खान यांच्याविरुद्ध अनेक फौजदारी खटले सुरू आहेत, त्यामुळे ते ऑगस्ट २०२३ पासून आदियाला तुरुंगात आहेत. अल-कादिर ट्रस्ट प्रकरण हे सर्वात हाय-प्रोफाइल प्रकरणांपैकी एक आहे, ज्यामध्ये माजी पंतप्रधान आणि त्यांच्या पत्नीवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत, आता याच प्रकरणावर सुनावणी पार पडणार आहे. अल-कादिर ट्रस्ट प्रकरणावर बोलतान पीटीआयचे प्रख्यात वकील आणि नेते गौहर अली खान म्हणाले की, '११ जून हा पक्षाचे संस्थापक इम्रान खान आणि त्यांच्या पत्नीसाठी महत्त्वाचा दिवस ठरू शकतो.

# पहलगाम हल्ल्यातील शहीदांच्या पत्नीचा अश्लील AI व्हिडीओ व्हायरल, पोलिसांची मोठी कारवाई

जम्मू – काश्मिर येथेल पहलगाममध्ये 22 एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात तब्बल 26 जणांनी आपले प्राण गमावले. या गल्ल्यात लेफ्टनंट विनय नरवाल यांची देखील गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. आता शहीद लेफ्टनंट विनय नरवाल यांच्या पत्नी AI च्या मदतीने अश्लील व्हिडीओ तयार करुन व्हायरल करणाऱ्या दोन सायबर आरोपींना पालिसांनी अटक केली आहे. अटक केलेल्यांवर आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) चा गैरवापर करून एका शहीद नौदल अधिकाऱ्याच्या पत्नीचा अश्लील व्हिडिओ तयार करून तो यूट्यूब



चॅनेलवर अपलोड केल्याचा आरोप आहे. हरियाणा पोलिसांनी गोपालगंज पोलिसांच्या मदतीने मांझा पोलिस स्टेशन परिसरातून दोन आरोपींना अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक केलेल्या आरोपींची ओळख मोहिबुल हक आणि गुलाम जिलानी अशी झाली आहे, ते मांझा पोलिस स्टेशन परिसरातील धोबावालिया गावातील रहिवासी आहेत. या प्रकरणात हरियाणातील गुरुग्राम येथील सायबर पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, तांत्रिक तपासात व्हिडिओचा स्रोत आणि स्थान शोधून दोन्ही आरोपींची ओळख पटवण्यात आली. गोपालगंजचे पोलिस अधीक्षक अवधेश दीक्षित म्हणाले की, तांत्रिक पुराव्यांच्या आधारे, यूट्यूब चॅनेल ट्रॅक करण्यात आले आणि नंतर हरियाणा पोलिसांच्या सहकार्याने आरोपींना अटक करण्यात आली. आरोपींकडून त्यांचं लॅपटॉप, मोबाईल आणि अन्य डिव्हाइस देखील ताब्यात घेण्यात आले आहेत.

अटक केलेल्या आरोपींच्या चौकशीदरम्यान, त्यांनी इतर अनेक लोकांना लक्ष्य करून असे व्हिडिओ बनवल्याचेही उघड झाले आहे. सध्या याप्रकरणी पोलीस कसून चौकशी करत आहेत. या सायबर आरोपींच्या गुन्हेगारी इतिहासाचाही पोलिस तपास करत आहेत.दोन्ही आरोपींना अटक केल्यानंतर पोलिसांनी त्यांना न्यायालयात हजर केलं, तेथून हरियाणा पोलिसांनी त्यांना ट्रान्झिट रिमांडवर घेऊन गुरुग्रामला नेले. त्यांवर कायदेशीर कारवाई हरियाणा याठिकाणी होईल असं देखील सांगण्यात येत आहे. सध्या याप्रकरणी सर्वत्र खळबळ माजली आहे.

# सफर शिवरायांच्या इतिहासाची, गौरव एक्स्प्रेस 9 जूनला मुंबईतून रवाना, सीएसएमटी येथे CM दाखविणार झेंडा

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक वर्धापन दिनानिमित्त भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळ लिमिटेड ( आयआरसीटीसी ) छत्रपती शिवाजी महाराज सर्किट भारत गौरव ट्रेन टूर सुरु करण्यात आली आहे. या ट्रेनच्या प्रवाशांना ५ रात्री आणि ६ दिवस अशा प्रवासात महाराजाच्या जीवनातील ऐतिहासिक घडामोडी घडलेल्या पर्यटन स्थळांचा समावेश केला आहे. या गौरव एक्सप्रेस ट्रेनला १०० टक्के बुकींग मिळाले आहे. उद्या सोमवारी दि.९ जून




२०२४ रोजी सकाळी ६ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या ट्रेन सीएसएमटी फलाट क्रमांक १८ वरुन हिरवा झेंडा दाखवून रवाना करणार आहेत.

पाच रात्री तर सहा दिवस प्रवास या ट्रेनमधून सुरुवातीला 710 प्रवाशांनी बुकींग केलेले आहे. त्यातील 480 प्रवासी इकॉनॉमी (स्लीपर)मध्ये 190 प्रवासी कम्फर्ट (3AC) मध्ये आणि 40 प्रवासी सुपीरियर (2AC) मधून प्रवास करणार आहेत. भारत गौरव ट्रेन टुरची योजना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 351व्या राज्याभिषेक वर्धापन दिनानिमित्ताने सुरु केली आहे. या ट्रेनचा प्रवास पाच रात्री तर सहा दिवस असा असणार आहे.

छत्रपती शिवारायांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी ही ट्रेन 9 जून, 2025 रोजी रायगडला पोहचार आहे. महाराष्ट्र सरकार आणि भारतीय रेल्वेने संयुक्तपणे ही ट्रेन सुरु केली आहे. या ट्रेनद्वारे प्रवाशांना रायगड किल्ला, शिवनेरी किल्ला, प्रतापगड किल्ला, पन्हाला किल्ला, लाल महल, कसबा गणपती आणि शिवसृष्टी सारख्या ऐतिहासिक स्थळांना कव्हर करणार आहे. ही ट्रेन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील महत्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट देणार आहे. तसेच यातील प्रमुख आकर्षणांमध्ये भीमाशंकर ज्योतिर्लिंग आणि कोल्हापुरच्या महालक्ष्मी मंदिराला भेट मिळाली आहे. पहिला मुक्काम राडगड

6 दिवसाची ही टुर CSMT मुंबई स्थानकातून प्रारंभ होणार आहे. पहिल्या दिवशी रेल्वे गाडी रेल्वेगाडी कोकण रेल्वे मार्गावर माणगांव रेल्वे स्थानकात पोहचेल. रायगड किल्ल्याजवळ रेल्वे लिंक आहे. त्यामुळे पहिला मुक्काम राडगड येथे होणार आहे. येथे रायगड किल्ला स्वराज्याची राजधानी असून येथे शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता. येथे शिवाजी महाराज्याचे निधन झाले होते. त्यामुळे महाराजाची समाधानी देखील येथे आहे. त्यानंतर पुन्हा या ट्रेनमध्ये बसून पुण्याला ही ट्रेन रवाना होणार आहे.पर्यटक येथे रात्रीचे जेवण करुन पुण्यातील हॉटेलात मुक्काम करणार आहेत. शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळाला भेटपुण्यात एका रात्रीत आराम केल्यानंतर तिसऱ्या दिवशी शिवनेरी किल्ल्याचे दर्शन घेता येणार आहे. येथे शिवाजी महाराजांचा जन्म झाला होता. दुपारी जेवल्यानंतर पर्यटक रात्री पुण्याहून परताण्याआधी 12 ज्योतिर्लिंग मंदिरांपैकी एक असलेल्या भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिराची दर्शन घेऊ शकणार आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com